महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्ष
८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.
दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल:cetcell@mahacet.org

क्र.तंशिप्र-१२२६/प्र.क्र.०७/ CAP/बीई/सुचना/२०२६/१६९६ दिनांक - १६/०७/२०२६

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता अभियांत्रिकी पदवी (बी.ई./बी.टेक.) (४ वर्षे) व अभियांत्रिकी व तंत्रज्ञान एकात्मिक पदव्युत्तर पदवी (५ वर्षे) (मास्टर ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी - इंटिग्रेटेड) प्रवेश प्रक्रिया

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता महाराष्ट्र राज्यातील शासकीय, शासन अनुदानित, विद्यापीठ व्यवस्थापित तसेच विनाअनुदानित खासगी व्यावसायिक शैक्षणिक संस्थांमधील चार वर्षे कालावधीच्या पूर्णवेळ अभियांत्रिकी व तंत्रज्ञान पदवी अभ्यासक्रमाच्या (बी.ई./बी.टेक.) प्रथम वर्ष प्रवेशासाठी इच्छुक उमेदवारांकरीता ऑनलाईन नोंदणी, कागदपत्रे अपलोड करणे, कागदपत्रांची ई-पडताळणी अथवा प्रत्यक्ष पडताळणी (उमेदवाराने निवडलेल्या पडताळणी पद्धतीनुसार), अर्ज पुष्टीकरण, प्राधान्यक्रम (Option Form) भरणे व पुष्टीकरण, जागा स्वीकृती, जागा स्वीकृती शुल्काचा ऑनलाईन भरणा तसेच संस्थेमध्ये प्रवेश निश्चित करण्यासाठी ही प्रवेश सूचना प्रसिद्ध करण्यात येत आहे.

उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरताना ई-पडताळणी (E-Scrutiny) किंवा प्रत्यक्ष पडताळणी (Physical Scrutiny) यापैकी एका पडताळणी पद्धतीची निवड करणे आवश्यक आहे. ई-पडताळणीची निवड केल्यास पडताळणी ऑनलाईन करण्यात येईल. प्रत्यक्ष पडताळणीची निवड केल्यास उमेदवाराने जवळच्या पडताळणी केंद्रास आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक राहील.

पात्रतेचे निकष : माहिती पुस्तिकेमध्ये नमूद केल्यानुसार.

ऑनलाईन प्रवेश नोंदणी :

उमेदवारांनी विहित वेळापत्रकानुसार www.mahacet.org या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज सादर करावा. एमएचटी-सीईटी २०२६ साठी नोंदणी केलेल्या उमेदवारांना प्रवेश नोंदणीसाठी कोणतेही शुल्क भरावे लागणार नाही. तथापि, शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील प्रवेशासाठी वैध असलेले JEE (Main) किंवा NEET (UG) गुण प्राप्त केलेले व एमएचटी-सीईटी २०२६ साठी नोंदणी न केलेल्या उमेदवारांनी विहित शुल्क केवळ ऑनलाईन पद्धतीने (क्रेडिट कार्ड/डेबिट कार्ड/नेट बँकिंग/यूपीआय इ.) भरावे. भरलेले शुल्क कोणत्याही परिस्थितीत परत केले जाणार नाही. इतर कोणतीही शुल्क भरण्याची पद्धत स्वीकारली जाणार नाही.

महाराष्ट्र राज्यातील सर्वसाधारण प्रवर्गातील, महाराष्ट्राबाहेरील (OMS), जम्मू व काश्मीर केंद्रशासित प्रदेश तसेच लडाख केंद्रशासित प्रदेशातील स्थलांतरित उमेदवार आणि आखाती देशांमध्ये (Gulf Countries) कार्यरत भारतीय कामगारांच्या पाल्यांसाठी प्रवेश नोंदणी शुल्क.	**₹ १३००/-**
केवळ महाराष्ट्र राज्यातील राखीव प्रवर्गातील [अनुसूचित जाती (SC), अनुसूचित जमाती (ST), विमुक्त जाती/भटक्या जमाती (VJ/DT-NT(A)), NT(B), NT(C), NT(D), इतर मागासवर्ग (OBC), विशेष मागास प्रवर्ग (SBC), आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS), सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग (SEBC*)] तसेच दिव्यांग (PWD) उमेदवारांसाठी प्रवेश नोंदणी शुल्क. अनाथ व तृतीयपंथी (Transgender/Other) उमेदवारांसाठी प्रवेश नोंदणी शुल्क.	**₹ १०००/-**

* **टीप : सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग (SEBC) उमेदवारांना आरक्षणाचा लाभ संबंधित याचिकांमधील मा. उच्च**

न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहील.

प्रवेश प्रक्रियेतील विविध टप्प्यांचे वेळापत्रक

अ. क्र.	प्रक्रिया	सुरवात तारीख	अंतिम तारीख
१.	महाराष्ट्र राज्य, अखिल भारतीय, जम्मू व काश्मीर केंद्रशासित प्रदेश तसेच लडाख केंद्रशासित प्रदेशातील स्थलांतरित उमेदवारांसाठी संकेतस्थळावर प्रवेशाकरिता ऑनलाईन अर्ज नोंदणी व आवश्यक कागदपत्रे अपलोड करणे.	०२-०७-२०२६	$_{१९-०७-२०२६}$ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत
२.	कागदपत्रांची पडताळणी व प्रवेश अर्जाचे पुष्टीकरण (ऑनलाईन पद्धतीने) महाराष्ट्र राज्य व अखिल भारतीय उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरून आवश्यक कागदपत्रे अपलोड करावीत. **ई-पडताळणी (E-Scrutiny) पद्धतीची निवड केलेल्या उमेदवारांसाठी :** १. उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरून मूळ कागदपत्रे स्कॅन करून अपलोड करावीत. २. अर्जाची पडताळणी व पुष्टीकरण नियुक्त सुविधा केंद्रामार्फत (FC) ऑनलाईन पद्धतीने करण्यात येईल. अशा उमेदवारास सुविधा केंद्रास प्रत्यक्ष भेट देण्याची आवश्यकता नाही. ३. अर्जामध्ये कोणतीही त्रुटी नसल्यास पडताळणी व पुष्टीकरणाची पावती (Receipt-cum-Acknowledgement) उमेदवाराच्या लॉगिनमध्ये उपलब्ध करून देण्यात येईल. त्रुटी आढळल्यास त्याची माहिती उमेदवाराच्या लॉगिनद्वारे कळविण्यात येईल. उमेदवाराने आवश्यक दुरुस्ती करून अर्ज पुन्हा सादर करावा. प्रत्यक्ष पडताळणी (Physical Scrutiny) पद्धतीची निवड केलेल्या उमेदवारांसाठी : उमेदवाराने स्वतः निवडलेल्या सुविधा केंद्रास (FC) विहित वेळेनुसार आवश्यक मूळ कागदपत्रांसह उपस्थित राहून अर्ज भरणे, कागदपत्रे अपलोड करणे, पडताळणी व अर्जाचे पुष्टीकरण करून घ्यावे. पडताळणी व पुष्टीकरणानंतर सुविधा केंद्रामार्फत पावती (Receipt-cum-Acknowledgement) प्रदान करण्यात येईल.	०३-०७-२०२६	$_{२०-०७-२०२६}$ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत
टीप :- शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील कॅप (CAP) व्यतिरिक्त इतर जागांवरील प्रवेशासाठी ऑनलाईन नोंदणी, कागदपत्रांची पडताळणी व अर्जाचे पुष्टीकरणाची सुविधा सर्व प्रकारच्या प्रवेशांसाठी विहित अंतिम दिनांकापर्यंत दुपारी २.०० वाजेपर्यंत, ई-पडताळणीद्वारे (E-Verification) सुविधा केंद्रामार्फत किंवा सुविधा केंद्रात प्रत्यक्ष कागदपत्र पडताळणीद्वारे उपलब्ध राहील.			
३.	महाराष्ट्र राज्य व अखिल भारतीय उमेदवारांची तात्पुरती गुणवत्ता यादी (Provisional Merit List) संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे.	२२-०७-२०२६	

४.	सर्व प्रकारच्या उमेदवारांकडून हरकती/आक्षेप (Grievances) सादर करणे : तात्पुरत्या गुणवत्ता यादीतील माहितीमध्ये आवश्यक दुरुस्तीसाठी उमेदवाराने स्वतःच्या लॉगिनद्वारे हरकत नोंदवावी. आवश्यक दुरुस्तीसाठी अर्ज उमेदवाराच्या लॉगिनमध्ये परत उपलब्ध करून देण्यात येईल. दुरुस्ती अथवा सवलतीच्या दाव्याच्या समर्थनार्थ आवश्यक कागदपत्रे अपलोड करावीत. हरकतीवरील निर्णय (स्वीकृत/अस्वीकृत) तसेच अद्ययावत पावती (Receipt-cum-Acknowledgement) उमेदवाराच्या लॉगिनमध्ये उपलब्ध करून देण्यात येईल. प्रत्यक्ष पडताळणी (Physical Scrutiny) पद्धतीची निवड केलेल्या उमेदवारांनी हरकतींचे निराकरण करण्यासाठी संबंधित सुविधा केंद्रास (FC) प्रत्यक्ष भेट द्यावी.	२३-०७-२०२६	२५-०७-२०२६ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत
५.	महाराष्ट्र राज्य व अखिल भारतीय उमेदवारांची अंतिम गुणवत्ता यादी (Final Merit List) संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे.	२७-०७-२०२६	
६.	कॅप फेरी-I (CAP Round-I) करिता प्रवर्गनिहाय तात्पुरती जागावाटप सारणी (Provisional Category-wise Seat Matrix) संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे.	२७-०७-२०२६	
केंद्रिभूत प्रवेश प्रक्रिया फेरी १			
७.	उमेदवारांनी स्वतःच्या लॉगिनद्वारे कॅप फेरी-I (CAP Round-I) साठी प्राधान्यक्रम (Option Form) ऑनलाईन भरून त्याची पुष्टी करणे.	२८-०७-२०२६	३०-०७-२०२६
८.	कॅप फेरी-I (CAP Round-I) ची तात्पुरती जागावाटप यादी (Provisional Allotment) संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे.	०२-०८-२०२६	
९.	कॅप फेरी-I (CAP Round-I) मध्ये वाटप झालेल्या जागेची उमेदवाराने स्वतःच्या लॉगिनद्वारे स्वीकृती देणे : अ) उमेदवाराने स्वतःच्या लॉगिनद्वारे घोषणापत्रास संमती देऊन त्यास मिळालेल्या जागेची स्व-पडताळणी (Self-Verification) करावी तसेच अर्जामध्ये नमूद केलेले पात्रता गुण, प्रवर्ग, लिंग, आरक्षण, विशेष आरक्षण इत्यादी बाबी व त्यासंदर्भातील अपलोड केलेली कागदपत्रे अचूक व प्रामाणिक असल्याचे प्रमाणित करावे. ब) अर्जामधील दाव्यामध्ये त्रुटी असल्याचे उमेदवाराच्या निदर्शनास आल्यास (माहिती पुस्तिकेतील नियम ९, उपनियम (३) मधील खंड (ई) नुसार) संबंधित हरकत केवळ ऑनलाईन पद्धतीने स्वतःच्या लॉगिनद्वारे नोंदवावी. क) कॅप फेरी-I मध्ये प्रथम प्राधान्यानुसार (Auto Freeze) जागा वाटप झालेल्या उमेदवारांनी ऑनलाईन पद्धतीने जागा स्वीकृती शुल्क भरून जागा निश्चित करावी. अशा उमेदवारांना पुढील कॅप फेऱ्यांमध्ये सहभागी होता येणार नाही.	०३-०८-२०२६	०५-०८-२०२६ दुपारी ३.०० वाजेपर्यंत

	ड) प्रथम प्राधान्याव्यतिरिक्त जागा वाटप होऊन **Self Freeze** पर्याय निवडणाऱ्या उमेदवारांनी जागा स्वीकृत करून ऑनलाईन पद्धतीने जागा स्वीकृती शुल्क भरावे. अशा उमेदवारांना पुढील कॅप फेऱ्यांमध्ये सहभागी होता येणार नाही. इ) प्रथम प्राधान्याव्यतिरिक्त जागा वाटप झालेल्या व पुढील फेऱ्यांमध्ये अधिक चांगल्या पर्यायासाठी **(Betterment)** सहभागी होऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी **Not Freeze / Betterment** पर्याय निवडून जागा स्वीकृत करावी व स्वतःच्या लॉगिनद्वारे ऑनलाईन पद्धतीने जागा स्वीकृती शुल्क भरावे.		
१०.	कॅप फेरी-I नंतर वाटप झालेल्या संस्थेमध्ये हजर राहून आवश्यक कागदपत्रे सादर करणे, शुल्क भरून प्रवेश निश्चित करणे : अ) अनुक्रमांक ९(क) व ९(ड) नुसार जागा स्वीकृत केलेल्या उमेदवारांनी वाटप झालेल्या संस्थेमध्ये आवश्यक कागदपत्रांसह हजर राहून प्रवेश निश्चित करावा. ब) संबंधित संस्था उमेदवाराच्या मूळ कागदपत्रांची पडताळणी करून संस्थेच्या लॉगिनद्वारे प्रवेशाची नोंद ऑनलाईन प्रणालीमध्ये करेल तसेच प्रवेश पुष्टीकरणाची संगणकनिर्मित पावती **(System Generated Receipt)** व शुल्क भरल्याची पावती उमेदवारास देईल. अर्जामध्ये केलेल्या चुकीच्या अथवा खोट्या दाव्याच्या आधारे जागा मिळाल्याचे आढळल्यास संबंधित संस्थेमार्फत प्रवेश दिला जाणार नाही. अशा परिस्थितीत उमेदवाराने स्वतःच्या लॉगिनद्वारे हरकत नोंदवावी.	०३-०८-२०२६	०५-०८-२०२६ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत
केंद्रिभूत प्रवेश प्रक्रिया फेरी २			
११.	कॅप फेरी-II (CAP Round-II) करिता तात्पुरत्या रिक्त जागांची यादी (Provisional Vacant Seats) संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे.	०६-०८-२०२६	
१२.	उमेदवारांनी स्वतःच्या लॉगिनद्वारे कॅप फेरी-II (CAP Round-II) साठी प्राधान्यक्रम (Option Form) ऑनलाईन भरून त्याची पुष्टी करणे.	०७-०८-२०२६	०९-०८-२०२६
१३.	कॅप फेरी-II (CAP Round-II) ची तात्पुरती जागावाटप यादी (Provisional Allotment) संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे.	१२-०८-२०२६	
१४.	कॅप फेरी-**II (CAP Round-II)** मध्ये वाटप झालेल्या जागेची उमेदवाराने स्वतःच्या लॉगिनद्वारे स्वीकृती देणे : अ) कॅप फेरी-**II** मध्ये प्रथमच जागा वाटप झालेल्या पात्र उमेदवारांनी अनुक्रमांक ९(अ) नुसार जागेची स्व-पडताळणी **(Self-Verification)** करावी व स्वतःच्या लॉगिनद्वारे ऑनलाईन पद्धतीने जागा स्वीकृती शुल्क भरावे.	१३-०८-२०२६	१७-०८-२०२६ दुपारी ३.०० वाजेपर्यंत

	ब) कॅप फेरी-II मध्ये प्रथम तीन प्राधान्यानुसार (Auto Freeze) जागा वाटप झालेल्या उमेदवारांनी ऑनलाईन पद्धतीने जागा स्वीकृती शुल्क भरून जागा निश्चित करावी. अशा उमेदवारांना पुढील कॅप फेऱ्यांमध्ये सहभागी होता येणार नाही. क) प्रथम तीन प्राधान्यांव्यतिरिक्त जागा वाटप होऊन Self Freeze पर्याय निवडणाऱ्या उमेदवारांनी जागा स्वीकृत करून ऑनलाईन पद्धतीने जागा स्वीकृती शुल्क भरावे. अशा उमेदवारांना पुढील कॅप फेऱ्यांमध्ये सहभागी होता येणार नाही. ड) प्रथम तीन प्राधान्यांव्यतिरिक्त जागा वाटप झालेल्या व पुढील फेऱ्यांमध्ये अधिक चांगल्या पर्यायासाठी (Betterment) सहभागी होऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी Not Freeze / Betterment पर्याय निवडून जागा स्वीकृत करावी व स्वतःच्या लॉगिनद्वारे ऑनलाईन पद्धतीने जागा स्वीकृती शुल्क भरावे.		
१५.	कॅप फेरी-II नंतर वाटप झालेल्या संस्थेमध्ये हजर राहून आवश्यक कागदपत्रे सादर करणे, शुल्क भरून प्रवेश निश्चित करणे : अ) अनुक्रमांक १४(ब) व १४(क) नुसार जागा स्वीकृत केलेल्या उमेदवारांनी वाटप झालेल्या संस्थेमध्ये आवश्यक कागदपत्रांसह हजर राहून प्रवेश निश्चित करावा. ब) संबंधित संस्था उमेदवाराच्या मूळ कागदपत्रांची पडताळणी करून संस्थेच्या लॉगिनद्वारे प्रवेशाची नोंद ऑनलाईन प्रणालीमध्ये करेल तसेच प्रवेश पुष्टीकरणाची संगणकनिर्मित पावती (System Generated Receipt) व शुल्क भरल्याची पावती उमेदवारास देईल. अर्जामध्ये केलेल्या चुकीच्या अथवा खोट्या दाव्याच्या आधारे जागा मिळाल्याचे आढळल्यास संबंधित संस्थेमार्फत प्रवेश दिला जाणार नाही. अशा परिस्थितीत उमेदवाराने स्वतःच्या लॉगिनद्वारे हरकत नोंदवावी.	१३-०८-२०२६	१७-०८-२०२६ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत
केंद्रिभूत प्रवेश प्रक्रिया फेरी ३			
१६.	कॅप फेरी-III (CAP Round-III) करिता तात्पुरत्या रिक्त जागांची यादी (Provisional Vacant Seats) संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे.	१८-०८-२०२६	
१७.	उमेदवारांनी स्वतःच्या लॉगिनद्वारे कॅप फेरी-III (CAP Round-III) साठी प्राधान्यक्रम (Option Form) ऑनलाईन भरून त्याची पुष्टी करणे.	१९-०८-२०२६	२१-०८-२०२६
१८.	कॅप फेरी-III (CAP Round-III) ची तात्पुरती जागावाटप यादी (Provisional Allotment) संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे.	२४-०८-२०२६	
१९.	कॅप फेरी-III (CAP Round-III) मध्ये वाटप झालेल्या जागेची उमेदवाराने स्वतःच्या लॉगिनद्वारे स्वीकृती देणे :	२५-०८-२०२६	२७-०८-२०२६ दुपारी ३.०० वाजेपर्यंत

	अ) कॅप फेरी-III मध्ये प्रथमच जागा वाटप झालेल्या पात्र उमेदवारांनी अनुक्रमांक ९(अ) नुसार जागेची स्व-पडताळणी (Self-Verification) करावी व स्वतःच्या लॉगिनद्वारे ऑनलाईन पद्धतीने जागा स्वीकृती शुल्क भरावे. ब) कॅप फेरी-III मध्ये प्रथम सहा प्राधान्यानुसार (Auto Freeze) जागा वाटप झालेल्या उमेदवारांनी ऑनलाईन पद्धतीने जागा स्वीकृती शुल्क भरून जागा निश्चित करावी. अशा उमेदवारांना पुढील कॅप फेऱ्यांमध्ये सहभागी होता येणार नाही. क) प्रथम सहा प्राधान्यांव्यतिरिक्त जागा वाटप होऊन Self Freeze पर्याय निवडणाऱ्या उमेदवारांनी जागा स्वीकृत करून ऑनलाईन पद्धतीने जागा स्वीकृती शुल्क भरावे. अशा उमेदवारांना पुढील कॅप फेऱ्यांमध्ये सहभागी होता येणार नाही. ड) प्रथम सहा प्राधान्यांव्यतिरिक्त जागा वाटप झालेल्या व पुढील फेऱ्यांमध्ये अधिक चांगल्या पर्यायासाठी (Betterment) सहभागी होऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी Not Freeze / Betterment पर्याय निवडून जागा स्वीकृत करावी व स्वतःच्या लॉगिनद्वारे ऑनलाईन पद्धतीने जागा स्वीकृती शुल्क भरावे.		
२०.	कॅप फेरी-III नंतर वाटप झालेल्या संस्थेमध्ये हजर राहून आवश्यक कागदपत्रे सादर करणे, शुल्क भरून प्रवेश निश्चित करणे : अ) अनुक्रमांक १९(ब) व १९(क) नुसार जागा स्वीकृत केलेल्या उमेदवारांनी वाटप झालेल्या संस्थेमध्ये आवश्यक कागदपत्रांसह हजर राहून प्रवेश निश्चित करावा. ब) संबंधित संस्था उमेदवाराच्या मूळ कागदपत्रांची पडताळणी करून संस्थेच्या लॉगिनद्वारे प्रवेशाची नोंद ऑनलाईन प्रणालीमध्ये करेल तसेच प्रवेश पुष्टीकरणाची संगणकनिर्मित पावती (System Generated Receipt) व शुल्क भरल्याची पावती उमेदवारास देईल. अर्जामध्ये केलेल्या चुकीच्या अथवा खोट्या दाव्याच्या आधारे जागा मिळाल्याचे आढळल्यास संबंधित संस्थेमार्फत प्रवेश दिला जाणार नाही. अशा परिस्थितीत उमेदवाराने स्वतःच्या लॉगिनद्वारे हरकत नोंदवावी.	२५-०८-२०२६	२७-०८-२०२६ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत
केंद्रिभूत प्रवेश प्रक्रिया फेरी ४			
२१.	कॅप फेरी-IV (CAP Round-IV) करिता तात्पुरत्या रिक्त जागांची यादी (Provisional Vacant Seats) संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे.	२८-०८-२०२६	
२२.	उमेदवारांनी स्वतःच्या लॉगिनद्वारे कॅप फेरी-IV (CAP Round-IV) साठी प्राधान्यक्रम (Option Form) ऑनलाईन भरून त्याची पुष्टी करणे.	२९-०८-२०२६	३१-०८-२०२६

२३.	कॅप फेरी-IV (CAP Round-IV) ची तात्पुरती जागावाटप यादी (Provisional Allotment) संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे.	०३-०९-२०२६	
२४.	कॅप फेरी-IV **(CAP Round-IV)** मध्ये वाटप झालेल्या जागेची उमेदवाराने स्वतःच्या लॉगिनद्वारे स्वीकृती देणे : कॅप फेरी-IV मध्ये प्रथमच जागा वाटप झालेल्या पात्र उमेदवारांनी अनुक्रमांक ९(अ) नुसार जागेची स्व-पडताळणी **(Self-Verification)** करावी व स्वतःच्या लॉगिनद्वारे ऑनलाईन पद्धतीने जागा स्वीकृती शुल्क भरावे.	०४-०९-२०२६	०७-०९-२०२६ दुपारी ३.०० वाजेपर्यंत
२५.	कॅप फेरी-IV नंतर वाटप झालेल्या संस्थेमध्ये हजर राहून आवश्यक कागदपत्रे सादर करणे, शुल्क भरून प्रवेश निश्चित करणे : कॅप फेरी-IV मध्ये प्रथमच जागा वाटप झालेल्या किंवा जागावाटपामध्ये सुधारणा **(Betterment)** झालेल्या अथवा पूर्वीचीच जागा कायम **(No Betterment/Earlier Seat Retained)** राहिलेल्या उमेदवारांसाठी सदर जागावाटप अंतिम राहील. अशा उमेदवारांनी वाटप झालेल्या संस्थेमध्ये आवश्यक कागदपत्रांसह हजर राहून विहित शुल्क भरून प्रवेश निश्चित करणे आवश्यक राहील.	०४-०९-२०२६	०७-०९-२०२६ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत
संस्थास्तरावरील कोटयातील जागा आणि केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेतील रिक्त राहीलेल्या जागांवर प्रवेश प्रक्रिया			
२६.	**संस्थास्तरीय प्रवेश** (Institute Level Admissions) **प्रक्रियेसाठी प्राधान्यक्रम अर्ज** (Option Form) **ऑनलाईन सादर करणे.**	०३-०८-२०२६	०७-०९-२०२६
२७.	**संस्थानिहाय उमेदवारांची यादी संबंधित संस्थांना ऑनलाईन उपलब्ध करून देणे.**	०८-०९-२०२६	
२८.	संस्थास्तरीय कोटा **(Institute Quota)** व कॅपनंतर रिक्त राहिलेल्या जागांवरील प्रवेश प्रक्रिया : संबंधित संस्थांनी खालीलप्रमाणे प्रवेश प्रक्रिया राबवावी – ● संस्थेच्या संकेतस्थळावर रिक्त जागांची माहिती प्रसिद्ध करणे तसेच वर्तमानपत्रामध्ये योग्य जाहिरात देणे. ● नोंदणीकृत उमेदवारांकडून अर्ज मागविणे. ● गुणवत्ता यादी तयार करून ती संस्थेच्या संकेतस्थळावर व सूचना फलकावर प्रसिद्ध करणे. ● शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या माहिती पुस्तिकेतील नियम १३ तसेच शासनाच्या प्रचलित प्रवेश नियमांनुसार प्रवेश प्रक्रिया पूर्ण करणे.	०८-०९-२०२६	१५-०९-२०२६
२९.	पूर्ण शुल्क परताव्यासह प्रवेश रद्द करण्याची अंतिम दिनांक (शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या माहिती पुस्तिकेतील नियम १५ नुसार)	१३-०९-२०२६	
३०.	शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता सर्व प्रकारच्या प्रवेशांसाठी अंतिम दिनांक (Cut-off Date)	१५-०९-२०२६ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत	
३१.	संस्थांसाठी : प्रवेशित उमेदवारांची माहिती (Details of Admitted Candidates) ऑनलाईन प्रणालीमध्ये अपलोड करण्याची अंतिम दिनांक.	१५-०९-२०२६ सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत	

➢ **जम्मू व काश्मीर केंद्रशासित प्रदेश तसेच लडाख केंद्रशासित प्रदेशातील स्थलांतरित (Migrant) उमेदवार :**

Sr No	Activity	Start Date	Last Date
१	"संचालक, सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालय (SPCE), वर्सोवा रोड, मुन्शी नगर, अंधेरी (पश्चिम), मुंबई - ४०००५८" येथे समुपदेशन फेरी (Counselling Round) आयोजित करण्यात येईल.	१८-०८-२०२६	२०-०८-२०२६
२	अंतिम जागावाटपानुसार वाटप झालेल्या संस्थेमध्ये आवश्यक कागदपत्रे सादर करून व विहित शुल्क भरून प्रवेश निश्चित करणे.	२१-०८-२०२६	२५-०८-२०२६

($) टीप : वरील वेळापत्रक तात्पुरते असून अपरिहार्य कारणास्तव त्यामध्ये बदल होऊ शकतो. वेळापत्रकात कोणताही बदल झाल्यास त्याबाबतची सुधारित सूचना संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

➤ उमेदवारांसाठी महत्त्वाच्या सूचना

१. उमेदवारांनी ई-स्क्रूटिनी केंद्र किंवा प्रत्यक्ष (Physical) स्क्रूटिनी केंद्रामार्फत ऑनलाईन भरलेल्या अर्जाची पुष्टी (Confirmation) न केल्यास, त्यांचा अर्ज रद्द करण्यात येईल व अशा उमेदवारांचे नाव केंद्रीय प्रवेश प्रक्रिया (CAP) तसेच बिगर-CAP (Non-CAP) प्रवेश प्रक्रियेसाठी तयार करण्यात येणाऱ्या गुणवत्ता यादीत (Merit List) समाविष्ट केले जाणार नाही.

२. अनुसूचित जाती (SC), विमुक्त जाती/भटक्या जमाती (VJ/DT (NT-A), NT-B, NT-C, NT-D), इतर मागासवर्गीय (OBC), विशेष मागास प्रवर्ग (SBC) व सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग (SEBC) प्रवर्गातील उमेदवारांनी जात वैधता प्रमाणपत्र (Caste Validity Certificate), अनुसूचित जमाती (ST) प्रवर्गातील उमेदवारांनी जमात वैधता प्रमाणपत्र (Tribe Validity Certificate), तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) प्रवर्गातील उमेदवारांनी EWS प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. SC व ST वगळता सर्व मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांनी दिनांक ३१ मार्च २०२७ पर्यंत वैध असलेले नॉन-क्रीमी लेयर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. दस्तऐवज पडताळणीच्या वेळी वरील प्रमाणपत्रे अथवा जात/जमात वैधता प्रमाणपत्राची पावती, नॉन-क्रीमी लेयर प्रमाणपत्र किंवा EWS प्रमाणपत्र सक्षम प्राधिकाऱ्याने जारी केलेले मूळ स्वरूपात सादर न केल्यास, अशा उमेदवारांचा CAP प्रवेश प्रक्रियेमध्ये खुला (GENERAL/Open) प्रवर्ग म्हणून विचार करण्यात येईल.

३. EWS प्रवर्गातील उमेदवारांनी महाराष्ट्र शासनाच्या शासन निर्णय क्रमांक राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक ३१/०५/२०२१ मध्ये नमूद केलेल्या नमुन्यानुसार आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) पात्रता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

४. जम्मू व काश्मीर केंद्रशासित प्रदेश तसेच लडाख केंद्रशासित प्रदेशातील स्थलांतरित (Migrant) उमेदवारांनी संचालक, सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालय (SPCE), वर्सोवा रोड, मुन्शी नगर, अंधेरी (पश्चिम), मुंबई § ४०००५८ येथे अर्ज नोंदणी व पुष्टीकरण केल्यानंतर, संबंधित प्राधिकरणाने ज्या संस्थेस कोटा मंजूर केला आहे त्या संस्थेशी प्रवेशासाठी थेट संपर्क साधावा.

५. जम्मू व काश्मीर व लडाख केंद्रशासित प्रदेशातील स्थलांतरित उमेदवारांना अर्जाची पडताळणी पूर्ण झाल्यानंतर त्यांच्या लॉगिनमध्ये Receipt-cum-Acknowledgement उपलब्ध करून देण्यात येईल. अंतिम मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज कोणतीही पूर्वसूचना न देता नामंजूर करण्यात येतील व याबाबत कोणताही पत्रव्यवहार स्वीकारला जाणार नाही.

६. आरक्षित प्रवर्गातून अर्ज केलेल्या उमेदवारास दस्तऐवज पडताळणीदरम्यान आरक्षणासंदर्भातील आवश्यक प्रमाणपत्रे सादर करता आली नाहीत, तर त्याने अर्ज शुल्कातील रु. ३००/- इतका फरक केवळ ऑनलाईन पद्धतीने भरावा लागेल.

७. उमेदवाराने संबंधित प्रवेश फेरीसाठी आपल्या लॉगिनद्वारे Option Form एकदा निश्चित (Confirm) केल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत त्यामध्ये बदल अथवा रद्द करण्याची परवानगी दिली जाणार नाही.

८. ज्या उमेदवारास जागा वाटप झाले असेल त्याने आपल्या लॉगिनमधून तात्पुरते जागा वाटप पत्र (Provisional Seat Allotment Letter) डाउनलोड करावे.

९. प्रत्येक जागा वाटपानंतर उमेदवाराने त्या-त्या वाटपासाठी निर्धारित Seat Acceptance Fee स्वतःच्या लॉगिनद्वारे केवळ ऑनलाईन पद्धतीने भरावी. ही रक्कम प्रक्रिया शुल्क असून ती कोणत्याही परिस्थितीत परत मिळणार नाही.

१०. प्रवेश निश्चिती प्रक्रिया: संबंधित महाविद्यालयाने मूळ कागदपत्रे व पात्रतेची पडताळणी विहित मुदतीत पूर्ण केल्यानंतर आणि प्रवेश प्रभारी यांनी ऑनलाईन प्रवेश पुष्टीकरणाची पावती (Online Receipt of Admission Confirmation) जारी केल्यानंतरच प्रवेश अंतिम समजला जाईल.

११. SC, ST, VJ/DT, NT(A), NT(B), NT(C), NT(D), SBC व EWS प्रवर्गातील ज्या उमेदवारांनी CAP नोंदणीवेळी जात/जमात वैधता प्रमाणपत्र, नॉन-क्रीमी लेयर प्रमाणपत्र किंवा EWS प्रमाणपत्राऐवजी पावती सादर केली असेल, त्यांनी मूळ प्रमाणपत्र स्क्रूटिनी केंद्रात अपलोड व पडताळणी करून घ्यावे तसेच CAP च्या चौथ्या फेरीतील अंतिम अहवाल सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी संबंधित प्रवेशित संस्थेत मूळ प्रमाणपत्र जमा करणे बंधनकारक राहील. अन्यथा त्यांचा प्रवेश आपोआप रद्द करण्यात येईल. त्यानंतर संस्थास्तरावरील प्रवेश प्रक्रियेमध्ये खुल्या प्रवर्गातील पात्रता निकष पूर्ण केल्यास त्यांचा खुल्या प्रवर्गातून विचार करण्यात येईल.

१२. OBC व SEBC प्रवर्गातील ज्या उमेदवारांनी जात वैधता प्रमाणपत्राऐवजी पावती सादर केली असेल, त्यांनी सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२०२४/प्र.क्र.७५(भाग-१)/आरक्षण-५, दिनांक ०२/०७/२०२६ मध्ये नमूद केलेल्या कालमर्यादेनुसार मूळ जात वैधता प्रमाणपत्र स्क्रूटिनी केंद्रामार्फत अपलोड व पडताळणी करून घेणे आवश्यक आहे.

१३. OBC व SEBC प्रवर्गातील ज्या उमेदवारांनी CAP नोंदणीवेळी नॉन-क्रीमी लेयर प्रमाणपत्राऐवजी पावती सादर केली असेल, त्यांनी मूळ नॉन-क्रीमी लेयर प्रमाणपत्र स्क्रूटिनी केंद्रामार्फत अपलोड व पडताळणी करून घ्यावे तसेच CAP च्या चौथ्या फेरीतील अंतिम अहवाल सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी संबंधित प्रवेशित संस्थेत मूळ प्रमाणपत्र जमा करणे आवश्यक आहे. तसे न केल्यास त्यांचा प्रवेश आपोआप रद्द करण्यात येईल. त्यानंतर संस्थास्तरावरील प्रवेश प्रक्रियेमध्ये खुल्या प्रवर्गातील पात्रता निकष पूर्ण केल्यास त्यांचा खुल्या प्रवर्गातून विचार करण्यात येईल.

१४. NRI, OCI, PIO, CIWGC व Foreign National (FN) प्रवर्गांतर्गत प्रवेशासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी https://fn.mahacet.org/ या संकेतस्थळाचा संदर्भ घ्यावा. OCI उमेदवारांच्या बाबतीत मा. सर्वोच्च न्यायालयाच्या WP(C) No. ८९१/२०२१ मधील आदेश लागू राहतील.

१५. अनाथ (Orphan) आरक्षण हे महाराष्ट्र शासनाच्या महिला व बाल विकास विभागामार्फत वेळोवेळी निर्गमित करण्यात येणाऱ्या शासन निर्णयांनुसार लागू राहील.

१६. संरक्षण (Defence) आरक्षण महाराष्ट्र शासनाच्या नियमांनुसार तसेच भारत सरकार, संरक्षण मंत्रालय, माजी सैनिक कल्याण विभाग यांच्या पत्र क्र. F.No.६(१)/२०१/D(Res.II), दिनांक २१ मे २०१८ नुसार लागू राहील.

१७. संस्थास्तरीय (Institutional Quota) व CAP नंतरच्या रिक्त जागांसाठी: उमेदवारांनी प्रथम स्क्रूटिनी केंद्रामार्फत अनिवार्य नोंदणी व कागदपत्र पडताळणी पूर्ण करावी. त्यानंतर संबंधित महाविद्यालयात थेट अर्ज करावा किंवा उमेदवार लॉगिनद्वारे संस्थास्तरीय पसंतीक्रम (Institute Level Option Form) भरावा, जेणेकरून संबंधित महाविद्यालयांना विहित वेळापत्रकानुसार गुणवत्ता यादी प्रसिद्ध करता येईल.

➤ सामान्य सूचना

१. स्क्रूटिनी केंद्रांची यादी संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

२. प्रवेशासाठी आवश्यक पात्रता, नियम व विनियम संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

३. वरील वेळापत्रक तात्पुरते असून अपरिहार्य कारणास्तव त्यामध्ये बदल होऊ शकतो. सुधारित वेळापत्रक, आवश्यक असल्यास, www.mahacet.org या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

४. अधिक माहितीसाठी/शंकानिरसनासाठी हेल्पलाईन क्रमांक +९१-९१७५१०८६१२ व १८००२०९८८५१ यावर सकाळी १०.०० ते सायं. ६.०० या वेळेत संपर्क साधावा. तसेच CAP पोर्टलवरील उमेदवाराच्या लॉगिनमध्ये Messaging System / Ticketing System ची सुविधाही उपलब्ध आहे.

५. सर्व प्रकारच्या कागदपत्र पडताळणीची प्रक्रिया शनिवार व रविवारसह दररोज सकाळी १०.०० ते सायं. ५.३० या वेळेत सुरू राहील. तथापि, १५ ऑगस्ट २०२६ व १४ सप्टेंबर २०२६ या सार्वजनिक सुट्ट्यांच्या दिवशी दस्तऐवज पडताळणीची प्रक्रिया बंद राहील.

आयुक्त
महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा
(सीईटी) कक्ष, मुंबई